जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम
काटा रोड वाशिम
दूरध्वनी ०७२५२-२३३६५३/२३४२३८ फॅक्स ०७२५२-२३२८५८
ईमेल : rdc_washim@rediffmail.com,वेबसाईट http://www.washim.nic.in

## टँकरने पाणी पुरवठा करण्यासंबधी अटी व शर्ती

(पाणी पुरवठा करणा-या टॅकरबाबत शासनाचे सुधारीत दर खालील प्रमाणे आहेत.)
(पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई यांचे शा.नि. क्र टंचाई-२०१२/ प्र क्र५२/पापु १४ दि. ३०/०४/२०१२)

| टॅकर /ट्रकवरील टाकीची पाणी वहन करण्याची क्षमता | कमाल प्रति दिन भाडे (रुपये) | कमाल प्रति किलोमीटर भाडे (रुपये) |
|---|---|---|
| १ मे टन | १५८.०० | २.०० |

निविदा धारकाने निवीदा सादर करतांना व्दिलिफाफा पध्दतीने सादर करावयाचा आहे. त्यापैकी क्र १ हा लिफाफा तांत्रीक बाबीचा असुन त्यात मागविण्यात आलेल्या कागद पत्राची पुर्तता करणा-या निवीदा धारकाचा लिफाफा क्र. २ दराबाबतचा उघडण्यात येईल.

**क्रमांक १ लिफाफ्यातील तात्रीक बाबींची पुर्तता न करणा-या निवीदा धारकाचा दुसरा लिफाफा क्रमांक २ उघडण्यात येणार नाही.**

| | |
|---|---|
| १ | **लिफाफा क्र १ मध्ये आवश्यक तपशिल**<br>(अ). अनामत रक्कम १,००,०००/- (अक्षरी एक लाख रुपये) ऑनलाईन पध्दतीन एस.बि.आय. इंटरनेट बँकिंग किवा एन.ई.एफ.टि. व्दारे स्विकारण्यात येईल. ती भरणा केल्याची पावती **UPLOAD करावी.**<br>(ब) निवीदे सोबत २५,००,०००/- ( अक्षरी पंचविस लक्ष रुपयाची ) राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरटी /एफ.डी.आर जिल्हाधिकारी वाशिम यांचे नावाने भरणा **स्कॅन कॉपी UPLOAD करावी.**<br>(क) कंत्राटदाराकडे स्वत:च्या मालकीचे कमीत कमी ५ टॅकर्स असणे आवश्यक आहे.निवीदा धारकाने ७.५ मे टन /१२ में.टन क्षमतेचे कमित कमी १० टॅकरची माहिती निवीदे सोबत देणे आवश्यक आहे.स्वत:च्या मालकिचे ५ टॅंकर असे व टॅंकर इतरांच्या मालकीचे असल्यास टॅकर मालकाचे टॅकर पुरविण्याबाबतचे हमीपत्र एकुन १० टॅंकरचे निवीदेसोबत स्कॅन करुन कॉपी सोबत जोडावी. तसेच आर. टि.ओ चे नोदणी प्रमाणपत्राची प्रत, फिटनेस, इन्शुरन्स, टॅक्स **स्कॅन कॉपी UPLOAD करावी.** तसेच हे टॅंकर नंबर्स इतर जिल्हयास दिलेले नसावेत.<br>(ड ) निवीदा धारकास मागील ३ वर्ष पाणी पुरवठा कामाचा अनुभव असलेबाबत जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या अनुभवाचा दाखला **स्कॅन कॉपी UPLOAD करावी.**<br>(इ) आयकर भरल्याचे अद्यावत प्रमाणपत्र, भागीदारी संस्थेच्या बाबतीत प्रत्येक भागीदाराने आयकर भरल्या बाबतचे प्रमाण पत्र. **स्कॅन कॉपी UPLOAD करावी.**<br>(ई) ई- निवीदा देणारी सहकारी संस्था असेल तर संस्था नोंदणी प्रमाणपत्र (उपविधी ) बायलॉज सोबत जोडावे तसेच संस्थेचे रोख भांडवल किती आहे याचा तपशिल जोडावा सहकारी संस्थेने निवीदा देतांना तिन वर्षाचा लेखा परीक्षण तपासणी अहवाल निवीदे सोबत जोडावा हि कागदपत्रे लिफाफा क्र १ मध्ये **UPLOAD करावी.**<br>**वरील कागदपत्राच्या छायांकीत प्रती साक्षांकीत करुन सादर कराव्यात.** |
| २ | **लिफाफा क्र २ मध्ये आवश्यक तपशिल**<br>ब) निवीदे सोबत देण्यात आलेल्या BOQ FILE मध्ये दर भरुन वेब साईटवर **UPLOAD करावी.**<br>तसेच ई- निविदा फॉर्म अटी व शर्तीसह मान्य असल्याबाबत रु १००/- चे बॉन्ड पेपरवर शपथपत्र करुन शपथपत्राची प्रत **स्कॅन कॉपी UPLOAD करावी.** |

| | |
|---|---|
| १ | निवीदा धारकाने स्वत:च्या मालकीचे ५ व इतरांच्या मालकीचे ५ असे एकुण १० टॅकरची माहिती घावी लागेल. टॅंकर इतरांचे मालकीचे असल्यास टॅकर पुरविण्याचे हमी पत्र दाखल करणे आवश्यक आहे. त्या करिता टॅकरचे आर.टि. ओ कडील नोदणी प्रमाणपत्राची प्रत व टॅकर मालकाचे .टॅकर पुरविण्याबाबतचे १०० रुपयेच्या स्टॅम्प पेपर वर असलेले हमी पत्र निवीदे सोबत लिफाफा क्र १ मध्ये सादर करणे आवश्यक आहे. याशिवाय आवश्यक तेवढे टॅंकर मागणी प्रमाणे पुरविणे निविदा धारकास बंधनकारक राहील. |
| २ | उपविभागीय अधिकारी, वाशिम/मंगरुळपीर/कारंजा किंवा वाशिम जिल्हयातील तहसिलदार सुचना देतील त्याप्रमाणे वाशिम जिल्हयातील कोणत्याही गावांना, वाडयांना तसेच ताडयांना सुध्दा टॅकरने पाणी पुरवठा करावा लागेल. |
| ३ | वाहनासाठी डिझेल /पेट्रोल/ऑईल पुरविण्याची जबाबदारी वाहतुक ठेकेदाराची राहील त्यासाठी आगावु रक्कम दिली जाणार नाही तसेच कंत्राटाच्या कालावधीत इंधनाचे / वाहनाच्या सुटया भागाचे दर वाढल्यास कोणत्याही प्रकारे दर वाढ दिली जाणार नाही.व तसी मागणी करता येणार नाही. |
| ४ | मंजुर केलेल्या निवीदा धारकास करारनाम्याची मुदत संपल्या नंतर सुध्दा हयाच निवीदा मंजुर दराने मा. जिल्हाधिकारी यांनी मुदतवाढ दिल्यास पाणी पुरवठा करावा लागेल. |
| ५ | अनामत रक्कम १,००,०००/- (अक्षरी एक लक्ष रुपये) ऑनलाईन पध्दतीन एस.बि.आय. इंटरनेट बँकिंग किवा एन.ई.एफ.टि. व्दारे स्विकारण्यात येईल |

| | |
|---|---|
| ६ | निवीदा मंजुर झाल्यापासुन ८ दिवसाचे आत रुपये १००/- (अक्षरी शंभर रुपये ) स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणे आवश्यक आहे. **करार नामा करुन न-दिल्यास** निवीदा ना-मंजुर करण्यात येईल. व अनामत रक्कम शासन जमा करण्यात येईल. |
| ७ | **निवीदा सोबत १ वर्षा पेक्षा जास्त** कालावधीची राष्ट्रीयकृत बॅकेची गॅरटी रुपये २५,००,०००/-(अक्षरी पंचविस लक्ष रुपये फक्त ) सादर करणे आवश्यक आहे. |
| ८ | वाहन चालक व स्वेच्छकांच्या वेतन ,भत्ते व राहण्याबाबत चा सर्व खर्च टॅंकर मालकाकडून देण्यात येईल .या बाबत या कार्यालयाची काही जबाबदारी राहणार नाही. |
| ९ | टॅकरने पाणी पुरवठा करतांना वाहनाचे लॉगबुक ठेवुन त्यावर गटविकास अधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याची दररोज लॉगबुकवर स्वाक्षरी घ्यावी लागेल. तसेच ज्या ठिकाणी पाणी पुरवठा केल्या जाईल त्या ठिकाणच्या दोन महिलांच्या दररोज स्वाक्ष-या घेणे ठेकेदारास बंधन कारक आहे. लॉग बुक व जि.पी.एस प्रणाली याचा मेळ घेउन त्यानुसारच भाडे व बिल आकारण्यात येईल. गटविकास अधिकारी यांनी टॅंकरचे देयक अदा करण्यापुर्वी संपुर्ण शहानिशा करुन तपासुन नंतरच देयक अदा करावे. |
| १० | टॅकरने पाणी पुरवठा केल्याबाबतचे काम असमाधान कारक आढळून आल्यास किंवा वेळेवर पाणी पुरवठा न केल्यास मंजुर निवीदाधारकाचे टॅकर्स बंद करण्यात येतील व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.व दंड बॅक गॅरंटी मधून वसुल करण्यात येईल. |
| ११ | पाणी पुरवठा करण्याबाबत दिलेल्या आदेशानुसार पाणी पुरवठा तात्काळ सुरु करावा लागेल. |
| १२ | टॅकर्स हे २४ तास सेवा या अटीवर घेण्यात येतिल व २४ तास पाणी पुरवठा करावा लागेल.व त्यानुसार प्रतिदिन भाडे आकारल्या जाईल. |
| १३ | पाणी पुरवठा करणा-या टॅकरला आर.टि.ओ मान्यता असने आवश्यक आहे. व त्या टॅंकर वरील सर्व कर भरलेले असावे .तसेच पाणी पुरवठा करणा-या टॅंकर/ट्रकवरील टाकीची पाणी वहन करण्याची क्षमते बाबत गट विकास अधिकारी यांनी शहानिशा करुनच तपासुन घ्यावी त्यानुसार टॅंकर/ट्रकला देण्यात येणारे प्रतिदिन व प्रति कीलो मिटर भाडे १ मे टन एककाच्या प्रमाणात देण्यात यावे. |
| १४ | निवीदा मंजुर झाल्यानंतर जेवढे टॅंकर्स सुरु करणेविषयी आदेश दिले जातील तेवढेच टॅकर आदेशात नमुद केलेल्या कालावधीसाठीच वापरले जातील तसेच जि.पी.एस प्रणालीप्रमाणे भाडे दिले जाईल. आणी आवश्यक्तेनुसार टॅंकरने पाणी पुरवठा करणे बाबत सुचित करण्यात येईल व तो संबधितास बंधनकारक असेल. |
| १५ | टॅकरने पाणी पुरवठा करतांना काही अपघात झाल्यास निवीदाधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलिस ठाण्यात द्यावी. अपघाताची न्यायालयीन अथवा इतर कोणतीही जबाबदारी हे कार्यालय स्विकारणार नाही . |
| १६ | निवीदाधारकाने त्याने दिलेल्या करारनाम्यातील कुठल्याही अटी वा शर्तीचा भंग केल्यास त्याची अनामत रक्कम तसेच त्यांने जेवढे दिवस पाणी पुरवठा केला असेल त्या दिवसाचे भाडे जप्त करण्यात येईल. व कंत्राटदाराचे नांव काळ्या यादीत समाविष्ठ करण्यात येईल . |
| १७ | या कार्यालयाचे मागणी प्रमाणे पाणी पुरवठया करिता २४ तासाचे आत टॅकर उपलब्ध न झाल्यास रु १०००/(एक हजार ) प्रतिदिन दंड आकारल्या जाईल व कंत्राटदाराचे नांव काळ्या यादीत समाविष्ट करण्यात येईल . |
| १८ | जिल्हयात पाणी पुरवठा करतांना वाहनास पडणारा **Toll पथकर स्वत:**( कंत्राटदाराला /ठेकेदाराला) भरावा लागेल. |
| १९ | टॅंकर वरिल भाडे तसेच टॅंकरचा इधन व वंगणचा खर्च हा शासनाकडून अनुदान उपलब्ध झाल्यानंतर देण्यात येईल. |
| २० | आयकर अधिनियम १९६१ मधील अधिनियम १९४ सी व वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या तरतुदीनुसार टॅंकरचे भाडयापोटी देण्यात येणा-या रकमेतुन आयकर/टि.डी.एस याची कपात द्यावी लागेल. |
| २१ | ई- निवीदा देणारी सहकारी संस्था असेल तर संस्था नोंदणी प्रमाणपत्र (उपविधी ) बायलॉज सोबत जोडावे तसेच संस्थेचे रोख भांडवल किती आहे याचा तपशिल जोडावा सहकारी संस्थेने निवीदा देतांना तिन वर्षाचा लेखा परीक्षण तपासणी अहवाल निवीदे सोबत जोडावा हि कागदपत्रे लिफाफा क्र १ मध्ये ठेवण्यात यावी. |
| २२ | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र दि. १५ मार्च २०१४ नुसार, पाणी पुरवठा करणा-या टॅंकरवर GPS प्रणाली बसविल्यानंतर GPS प्रणालीवर ज्या टॅंकरच्या फे-यांची नोंद होईल त्या फे-या देयकाकरीता अनुज्ञेय होतील. व ज्या पाणी पुरवठा करणा-या टॅंकरवर GPS प्रणाली नसेल आणि टॅंकरवाहतुक धारकांनी टॅंकरच्या फे-या झाल्याचा दावा केल्यास अशा फे-या बनावट ठरतील. पाणी पुरवठा करणा-या टॅंकरवर GPS प्रणाली बसविणे व त्याची देखभाल दुरुस्ती ईत्यादी बाबतचा खर्च संबधित टॅंकर वाहतुक दाराने करावा. |
| २३ | चालु वर्षाकरीता टॅंकरने पाणी पुरवठयाकरीता करारनामा केल्याच्या दिनांकापासुन पुढील एका वर्षापर्यंत मुदत राहील. चालु वर्षाचा करारनामा झाल्यानंतर मागील करारनाम्याची मुदत दि.३०/१२/२०१५ रोजीची हया करारनाम्याप्रमाणे संपुष्टात येईल. |
| २४ | वेळोवेळी शासन निर्णयात झालेले बदल निविदा धारकास बंधनकारक राहतील. |
| २५ | वरील अटि व शर्ती मध्ये निवीदा फार्मस विक्री व स्विकृती चे कालावधीत फेरफार करण्याचा तसेच काही नविन अटी व शर्ती समाविष्ट करण्याचा तसेच काही अटी शितील करण्याचा तसेच कोणतेही कारण न देता एकतर्फी निवीदा नामंजुर करण्याचा व करारनामा संपुष्टात आणन्याचा अधिकार मा. जिल्हाधिकारी याचे कडे राखीव ठेवण्यात आला आहे तो निविदा धारकास बंधकारक असेल तसेच निवीदा रद्द करणे, पुढे ढकलने, तहकुब करणे हा अधिकार राखुन ठेवला आहे. ई - निवीदे संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास तयावर निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी वाशिम यांनी यांचा राहील व तो निर्णय अंतीम राहील. |

**स्वा/-**

**जिल्हाधिकारी वाशिम करीता**

# <u>जाहीर ई-निवीदा सुचना</u>

वाशिम जिल्हयातील टंचाईग्रस्त ग्रामीण भागातील गावे, वाडया, तांडे क्षेत्रामध्ये आवशक्तेनुसार खाजगी टँकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी ईच्छुक निवीदा ६ ारकाकडून करारनामा केल्याच्या दिनाकापासुन १ वर्ष कालावधीकरीता ई-निवीदा मागविण्यात येत आहे. निवीदेबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | वाशिम जिल्हयातील टंचाईग्रस्त ग्रामीण भागातील गावामध्ये आवश्यक्तेनुसार खाजगी टँकरने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे |
| ऑनलाईन निवीदा व फार्म ची किंमत | रू ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) प्रती निवीदा रक्कम ऑनलाईन पध्दतीन एस.बि.आय. इंटरनेट बँकिंग किवा एन.ई.एफ.टि. व्दारे स्विकारण्यात येईल. |
| ई- निवीदा विक्री व डाउनलोड करण्याचा दिनांक | दिनांक ७/१२/२०१५ सकाळी १०.०० ते दि २१/१२/२०१५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| बयानाची रक्कम | अनामत रक्कम १,००,०००/- (अक्षरी एक लक्ष रुपये) ऑनलाईन पध्दतीन एस.बि.आय. इंटरनेट बँकिंग किवा एन.ई.एफ.टि. व्दारे स्विकारण्यात येईल |
| सुरक्षा ठेव रक्कम | रुपये २५,००,०००/- (अक्षरी रू. पंचविस लक्ष फक्त) सुरक्षा ठेव म्हणुन राष्ट्रीयकृत बॅंकेची गॅरंटी (हमीपत्र) एफ.डी.आर. निवीदे सोबत स्कॅन कॉपी **UPLOAD** करावी. |
| ई निवीदा ऑनलाईन भरण्याची अंतीम दिनांक | दिनांक २१/१२/२०१५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| लिफाफा क्र १ मधील मुळ कागदपत्रे कार्यालयास दाखल करण्याचा अंतीम दिनांक | दिनांक २१/१२/२०१५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत |
| ई निवीदा लिफाफा क्र १ व २ उघडण्याचा संभाव्य दिनांक व स्थळ | दिनांक २२/१२/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम येथे |

अटी व शर्ती खालील प्रमाणे

१. कोणतीही इ- निवीदा स्विकारणे अथवा रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी वाशिम यांनी राखुन ठेवले आहेत.
२. सदर निवीदेबाबत निविदाधारक मा. न्यायालयात गेल्यास त्याची कार्यकक्षा हि वाशिम जिल्हा असेल.
३. प्रस्तुत ई-निविदा सुचना <u>http://www.mahatenders.gov.in</u> या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ई निवीदा अटी व शर्तीबाबतची माहीती <u>http://www.washim.nic.in</u> या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
४. रू ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) प्रती निवीदा रक्कम ऑनलाईन पध्दतीन एस.बि.आय. इंटरनेट बँकिंग किवा एन.ई.एफ.टि. व्दारे भरणा केल्यानंतर दिनांक ०७/१२/२०१५ वेळ सकाळी १०.०० वाजता ते दि २१/१२/२०१५ रोजी वेळ सायं. ५.०० वाजता ऑनलाईन पध्दतीने मिळतील ज्या कंत्राटदारांना काळ्या यादीत घोषीत केले असेल, किंवा त्याबाबत कार्यवाही सुरु असेल त्यांनी किंवा त्याचेशी सलग्न असलेल्या कंत्राटदारांनी सदर निविदा भरु नयेत, अशा कंत्राटदारांनी ई-निविदा भरल्यास किवा पुढील कालावधीत त्यांची याबाबत सत्यता समोर आल्यास त्यांची ई-निविदा रद्द करण्यात येईल.
५. जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम येथे उपस्थित कंत्राटदार यांच्या समक्ष ई-निविदा लिफाफा क्र १ व २ दिनांक २२/१२/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता अथवा निम्न स्वाक्षरीतांच्या सोई नुसार ऑनलाईन पध्दतीने उघडण्यात येतील. ई-निविदा उघडण्याची तारीख व वेळ आवश्यक असल्यास बदलण्याचे अधिकार जिल्हाधिकारी वाशिम यांनी राखुन ठेवले आहेत.
६. निविदा दोन संच लिफाफा पध्दतीने भरावी लागेल.

स्वा/-

जिल्हाधिकारी वाशिम करीता

**जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम**

**(पाणी टंचाई विभाग)**

**वाशिम जिल्हयातील पाणी टंचाईग्रस्त ग्रामीण भागातील गावांमध्ये आवश्यकतेनुसार खाजगी टैंकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेबाबत.**

**निविदा सन २०१५-२०१६**

**लिफाफा क्र - २ मध्ये नमुद करावयाचा तपशील .**

| अ.क्र. | टँकर /ट्रवरील टाकीची पाणी वहन करण्याची क्षमता | शासन निर्णय दि. ३० एप्रिल २०१२ नुसार मान्य दर | | निविदाकार कोणत्या दराने टाक्यासह ट्रक/ टँकर्स उपलब्ध करुन देण्यास तयार आहे. | |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ मे.टन | कमाल प्रतिदिन भाडे रु. | कमाल प्रति कि.मी. भाडेरु. | प्रतिदिन भाडे रु. | प्रति कि.मी. भाडे रु. |
| | | १५८ रु (अक्षरी एकशे अठ्ठावन रु.) | २.०० (अक्षरी - दोन रु. फक्त ) | | |

टिप :- निविदेतील अटि व शर्ती मी वाचल्या असून त्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असून मला बंधनकारक आहेत. करीता खाली स्वाक्षरी करीत आहे.

दिनांक :- निविदा धारकाची सही ------------------------------

ठिकाण:- निविदा धारकाचे नाव -------------------------------

फर्मचे नाव व पत्ता -------------------------------